<u>नवी मुंबई महानगरपालिका</u>
<u>महापालिका सर्वसाधारण सभा</u>

महानगरपालिकेच्या मंगळवार, दिनांक 18/04/2017 रोजी भरलेल्या माहे एप्रिल महिन्याच्या सर्वसाधारण सभेत मंजूर/नामंजूर इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसुदा स्वरुपात खालीलप्रमाणे आहे. :-

| | |
|---|---|
| **विषय क्र. 04.**<br>**दिनांक 18 एप्रिल 2017** | केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत हरित क्षेत्र विकास **Green Space Development** अंतर्गत प्रस्ताव सादर करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 09/03/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/उद्यान/407/2017. |
| **<u>ठराव क्र. 1610.</u>**<br>**दिनांक 18 एप्रिल 2017** | "केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत हरित क्षेत्र विकास **Green Space Development** अंतर्गत प्रस्ताव सादर करण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. 1 कोटी, 90 लाख, 68 हजार, 201 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>मंजूर</u>** |
| **विषय क्र. 05.**<br>**दिनांक 18 एप्रिल 2017** | कोपरखैरणे विभागातील श्रमिकनगर झोपडपट्टीत मलनि:स्सारण वाहिन्या टाकणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 10/03/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./374/2017. |
| **<u>ठराव क्र. 1611.</u>**<br>**दिनांक 18 एप्रिल 2017** | "कोपरखैरणे विभागातील श्रमिकनगर झोपडपट्टीत मलनि:स्सारण वाहिन्या टाकण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. 53 लाख, 44 हजार, 879 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>मंजूर</u>** |
| **विषय क्र. 06.**<br>**दिनांक 18 एप्रिल 2017** | नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टी भागामध्ये घरगुती नळजोडणी मंजुरी करीता कार्यप्रणाली सुलभ करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 15/03/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./315/2017. |
| **<u>ठराव क्र. 1612.</u>**<br>**दिनांक 18 एप्रिल 2017** | "नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टी भागामध्ये घरगुती नळजोडणी मंजुरी करीता कार्यप्रणाली सुलभ करण्याच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या नळ जोडणी मंजूरीकरीता आवश्यक कागद पत्रे 1) नळ जोडणीचा अर्ज 2) सन 2000 पूर्वीचे सर्वेक्षण पावतीची छायाप्रत 3) आधारकार्डची छायाप्रत सादर करणे. छाननी शुल्क व सुरक्षा अनामत रक्कम परिच्छेद क्रमांक 4 मध्ये नमुद केल्याप्रमाणे आकारणी करणे आणि रस्ता खोदाई शुल्कात पूर्ण सुट देणे. सध्या ज्या ठिकाणी |

| | |
|---|---|
| | सार्वजनिक नळखांब आहेत अशा झोपड्यांच्या ठिकाणची पाणी देयकाची थकबाकी रक्कम दर चार महिन्यातून एक हप्ता या नुसार तीन समान हप्तांमध्ये भरणा करणे, तसेच ज्या ठिकाणी सार्वजनिक नळखांब अस्तित्वात नाहीत. अशा ठिकाणी पाणी देयक निरंक करणे या धोरणात्मक निर्णयास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम क्र. 66 (1) नुसार, प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>मंजूर</u>** |
| **विषय क्र. 07.**<br>**दिनांक 18 एप्रिल 2017** | नमुंमपा शिक्षण विभाग अंतर्गत बालवाडी ते 10 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना अपघात व अपघाती मृत्यु झाल्यास अर्थसाहय करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 16/03/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/शि.वि./टे.क्र.06/781/2017. |
| **<u>ठराव क्र. 1613.</u>**<br>**दिनांक 18 एप्रिल 2017** | "प्रस्तृत विषय सभेत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने **<u>मागे घेण्यात</u>** यावा." |
| **निर्णय -** | **<u>मागे घेतला.</u>** |
| **विषय क्र. 08.**<br>**दिनांक 18 एप्रिल 2017** | नमुंमपाच्या सार्वजनिक रूग्णालय वाशी येथील रूग्णालयात **CT Scan** सुविधा सुरू करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 21/03/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/आरोग्य/1731/2017. |
| **<u>ठराव क्र. 1614</u>.**<br>**दिनांक 18 एप्रिल 2017** | "नमुंमपाच्या सार्वजनिक रूग्णालय वाशी येथील रूग्णालयात **CT Scan** सुविधा सुरू करण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह वार्षिक अपेक्षित खर्च रक्कम रू. 64 लाख, 56 हजार मात्र व त्यानुसार पाच वर्षे कालावधीकरीताचा एकूण रक्कम रु. 3 कोटी, 22 लाख, 80 हजार मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>आरोग्य समितीकडे परत पाठविला.</u>** |
| **विषय क्र. 09.**<br>**दिनांक 18 एप्रिल 2017** | नमुंमपाच्या सार्वजनिक रूग्णालय ऐरोली व नेरूळ येथील रूग्णालयात डायलेसीस सुविधा बाहय यंत्रणेद्वारे सुरू करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 21/03/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/आरोग्य/ 1732/2017. |
| **<u>ठराव क्र. 1615.</u>**<br>**दिनांक 18 एप्रिल 2017** | "नमुंमपाच्या सार्वजनिक रूग्णालय ऐरोली व नेरूळ येथील रूग्णालयात डायलेसीस सुविधा बाहय यंत्रणेद्वारे सुरू करण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह वार्षिक रक्कम रू. 1 कोटी, 73 लाख, 16 हजार मात्र व त्यानुसार पाच वर्षे कालावधीकरीताचा एकूण रक्कम रु. 8 कोटी, 65 लाख, 80 हजार मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी. " |
| **निर्णय -** | **<u>आरोग्य समितीकडे परत पाठविला.</u>** |

| | |
|---|---|
| **विषय क्र. 10.**<br>**दिनांक 18 एप्रिल 2017** | घणसोली विभागातील प्रभाग क्रमांक 32 येथील साईसदननगर परिसरात उर्वरित ठिकाणी मलनि:स्सारण वाहिन्या टाकणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 21/03/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./441/2017. |
| **<u>ठराव क्र. 1616.</u>**<br>**दिनांक 18 एप्रिल 2017** | "घणसोली विभागातील प्रभाग क्रमांक 32 येथील साईसदननगर परिसरात उर्वरित ठिकाणी मलनि:स्सारण वाहिन्या टाकण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. 54 लाख, 4 हजार, 21 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी. " |
| **निर्णय -** | **<u>मंजूर</u>** |
| **विषय क्र. 61.**<br>**दिनांक 18 एप्रिल 2017** | नवी मुंबई महापालिका कार्यक्षेत्रात कोपरखैरणे से. 02 व घणसोली से.04 येथे निराश्रित व शहरी बेघरांसाठी निवारा केंद्र बांधण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 21/03/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./442/2017. |
| **<u>ठराव क्र. 1617.</u>**<br>**दिनांक 18 एप्रिल 2017** | "नवी मुंबई महापालिका कार्यक्षेत्रात कोपरखैरणे से. 02 व घणसोली से.04 येथे निराश्रित व शहरी बेघरांसाठी निवारा केंद्र बांधण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह कोपरखैरणे से.02, भूखंड क्र.26 येथे निवारा केंद्रासाठी एकूण रक्कम रु. 1 कोटी, 51 लाख, 33 हजार 797 मात्र इतक्या व घणसोली से.04, भूखंड क्र. 240 येथे निवारा केंद्रासाठी एकूण रक्कम रु. 2 कोटी, 54 लाख, 91 हजार 937 मात्र इतक्या खर्चास, शासनाच्या अनुदानाव्यतिरिक्त होणाऱ्या अतिरिक्त खर्चास व सदरील प्रस्ताव मुंबई मनपा अधिनियम 73 नुसार महासभेच्या प्रशासकीय व वित्तीय मान्यतेनंतर प्रस्ताव मा. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय आणि राज्य अभियान संचालक, दीनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान, वरळी, मुंबई यांचेकडे पाठविण्यास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी. " |
| **निर्णय -** | **<u>मंजूर</u>** |

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**महानगरपालिका सचिव,**
**नवी मुंबई महानगरपालिका.**